REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2018

# म. फूले यांच्या आर्थिक विचारातील बहुजनांचा स्वयंरोजगार व कौशल्य विषयक प्रगल्भता जागतिकीकरणाची आवश्यकता



सहा. प्रा. जयंत एम. बनसोड
वाणिज्य विभाग गो. सी. टोम्पे , कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय , चांदूर बाजार, जि. अमरावती.

''विद्ये विना मती गेली, मति विना निती गेली,
निती विना गती गेली, गती विना वित्त गेले
वित्त विना शुद्र खचले, एवढे अनर्थ एका अविद्येने केले''

आजच्या जागतिकीकरणाच्या काळात 21 व्या शतकांत भारत देश महासत्ताक होण्याचे स्वप्न पहात असतांना प्रत्यक्ष देशाच्या इतिहासाचा विचार केला तर वरच्या झगमगाटीने महासत्ता बनूनही परंतू प्रत्यक्षात भारतातील 130 कोटी लोकसंख्येच्या देशात देशाला स्वातंत्र्य मिळून 70 वर्षे पूर्ण झाली तरी गरीबी, दारीद्रय, बेकारी, भ्रष्टाचार, शोषण, पिळवणूक या रोगाने ग्रस्त आहे. कारण भारतावर आर्य ब्राम्हणांचे पूर्वीपासून वर्चस्व असल्यामुळे ते बहुजनांना समानतेने वागविणार नाहीत याचसाठी भारतात अनेक महान लोकांनी व्यवस्थेच्या विरूध्द बंड पुकारले त्यातीलच या व्यवस्थेचे मान अपमानाचे चटके सहन करावे लागलेले महात्मा ज्योतीबा गोविंदराव फुले एक होत. ''वेड लागले जनतेला, देव म्हणती धोंडयाला सांभाळी तुझी लेकरे पुण्य समजती पापाला'' या म्हणीनुसार देशातील लोकांना श्रध्दा, अंधश्रध्दा, पाप, पुण्य, भक्ती या मागे लावून त्यांचा मलिदा खाण्याचा विनाश्रम मोबदला मिळविण्याचा उदेृश ते पूर्ण करीत आहेत व देशातील भोळी बापडी जनता त्यांचे सांगण्यानुसार देव, धर्म, यामधे आपला वेळ व पैसा, बुध्दी, खर्च करीत आहेत जागतिकीकरणाच्या काळात प्रचार व प्रसार ची अत्याधुनीक साधने उपलब्ध असतांनाही ही व्यवस्था जसे थे वादी रहावी याच उदेृशाने ब्राम्हणवादी वर्णवादी लोक प्रयत्नरत आहेत हे सर्व उलथुन पाडण्या करीता आम्हाला आमचा इतिहास समजून घ्यावा लागतो.

भारत हा बुध्दाचा, सम्राट अशोकाचा देश असून या देशात समता स्वातंत्र्य बंधुत्व व न्याय या तत्वाने देश चालत होता. राज्यात कोणीही दुःखी, कष्टी नव्हता, सुंखी संपन्न व समाधानी होता त्यामुळेच भारत ही सोन्याची खाण आहे. येथून सोन्याचा धुर निघत होता एवढा नैसर्गिक दृष्टया संपन्न देश असतांना जगात भारत देशाची गुंलामांचा देश म्हणुन ओळख आहे. कारण देशावर अनेकांनी स्वाऱ्या केल्या व देशाला गुलाम बनविले. देशातील ब्राम्हणांनी (भट) परकिय लोकांसमोर लाड घोळून आपला स्वार्थ पाहीला व त्यांना हवे ते मिळवून घेतले व देशातील जनतेची संपत्तीची मोठया प्रमाणात लूटमार झाली. परंतु तरीही परकिय लोकांनी देशातील शुद्रातीशुद्र (बहुजन) यांच्या सुधारणासाठी कारणीभूत आहेत. परंतू आर्य (ब्राम्हण) जे इराणी लोक यांनी देशावर स्वाऱ्या करून देशातील अर्थव्यवस्थेला बाधा पोहचविली. देशातील रोजगार बुडविला, कला, कौशल्य यांचा ऱ्हास केला त्यासाठी त्यांनी मनुसंहिता (मनुचा कायदा) करून त्याला धर्माची पृष्ठी देवून प्रजेला अज्ञानात अंधरात व अंधश्रध्देत ठेवण्याचे षढयंत्र रचले. आर्य (ब्राम्हण) यांच्याशिवाय देशावर मुसलमान अफगाण/मोगल/ डच पोर्तूगीज, फ्रेंच यांनी स्वाऱ्या केल्या त्या विशेष प्रकारच्या नव्हत्या कारण त्यांची काहीच ठिकाणी सत्ता होती त्यांनी फक्त धन संम्पत्ती लुटून नेली त्यांचे काळात विशेष सुख प्राप्त झाले नसले तरी विशेष दुःखही प्राप्त झाले नाही. परंतू आर्य (ब्राम्हण) या देशात येवून येथील

मुलनिवासी जनतेला आपल्यातील कपटाचा कसबाने गुलाम, दास बनविण्याचे काम केले. ब्राम्हण म्हणजे कपट, मत्सर, क्रुरता व आपलपोटेपणा (स्वार्थ/मतलब) यागुणांचे ते मुर्तीमंत पूतळे आहेत.

''जिस तन लागे वही तन जाने
बीजा क्या जाने गण्हारा रे''

या वर्णवादी, जातीवादी व्यवस्थेचा चटका प्रत्यक्षात सहन केल्यामूळे व्यवस्थेच्या विरूध्द बंड करून येथील भटाब्राम्हणांनी आमचा रोजगार, उत्पन्न, बुडविले. आमच्या श्रमाचा मोबदला अर्धपोटी राहण्या इतकाच कसा मिळेल याची तरतुद केली व आयुष्यभर आमचे गुलाम कसे राहाल याविषयी भेद निर्माण करण्याचे कार्य करत आहेत हे बहुजनांना दाखवून देण्याचे काम म. फूले यांनी केले. व आपल्या संपूर्ण अंधकारमय जीवनाचे कारण फक्त शिक्षण (विद्या) आहे हे ओळखून सर्वांनी शिक्षण कसे मिळेल, स्त्री पुरूष समानता कशी राहील यासाठी त्यांचे हयातील त्यांनी प्रयत्न केले. त्यानंतर छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांचे कार्य पुढे नेवून शोषण व्यवस्थेविरूध्द लढा तेवत ठेवण्याचे काम केले आहे.

भारत देशात रोजगार उत्पन्नाची नैसर्गिक साधने, संम्पत्ती, कुशलता, श्रमजीवी मनुष्यबळ असतांनाही देश अधोगतीला का गेला याची खरी नाळ ओळखून त्यावर प्रहार करण्याचे काम महात्मा फूले यांनी केले आहे.

म. फूले यांनी आपल्या नाटयपूर्ण लेखात लोकांना समजेल अशा भाषेत 1885 ला 'तृतीय रत्न' या नाटकातून शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे व त्यामूळे त्याची कशी अवस्था बदलू शकते हे दाखवून शिक्षणविषयी जाणीव जागृती निर्माण केली, त्यांनी गुलामगिरी ते सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथामधून लोकांना जागृत करण्याचे काम केले. 'मानवाची आच' जाणीव निर्माण करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या गौरवगितातून जातीपाती विरहीत समतावादी विचार रूजविणे, विषमतावादी व्यवस्थेविरूध्द बंड पुकारणे अशा ध्येय विचाराने कार्य केले. त्यांनी हे जाणले होते की, स्त्री शुद्रानिशुद्र उपेक्षीत बहुजन समाज हाच भारताचा भाग्यविधाता आहे, भारतातील शेतकरी शेतमजूर यांची खरी अवस्था, त्यांचे होणारे शोषण याचे संपूर्ण चित्र 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथात मांडले याचसाठी सहकारातून शेती, कृषी औद्योगिकीकरण शेतीचे अत्याधुनिकरण हा त्यांचा विशेष आग्रह होता. त्यांनी त्या काळात केलेली शिक्षणाच्या पूर्नरचनेची मागणी आजही लागू पडते कारण आजचे शिक्षण फक्त कारकुन, हमाल निर्माण करणारे आहे म्हणून त्यांनी कुशलतेवर भर दिला होता.

म. फूले यांनी आपल्या लढा व संघर्षातून लोकांसमोर लोकसंख्या वाढ, शेतीवर वाढणारा भार, शेतीचे तुकडीकरण, पर्यावरणाचा विनाश, व्यसनमुक्ती, अंधश्रध्दा निर्मूलन जातीभेद, उचनिचता हि आमच्या प्रगतीस कशी बाधा पोहचविते यातून आम्ही कसे बाहेर पडावे. यासाठी मार्गदर्शन केले आहे परंतू काळानूसार आम्ही बदलेला असलो तरी प्रामुख्याने मुळ उद्देशापासून आम्ही कोसो दूर आहोत म्हणून आज आमची अधोगती आहे विविध समस्या शेतकरी आत्महत्या, निराशवाद आमचे समोर आहेत त्यामूळे आजही म. फूले चे विचार अवलंबिल्यास यातून मार्ग काढता येतो.

निर्मीले निर्मीला मानव पवित्र/कमी जास्त सुत्र बुध्दिमधे पिढीजात बुध्दि नाही सर्वांमधी/शोध करा आधी/पूर्तेपणी

निर्मीक (देव/इश्वर) याने मानवाला जन्म दिला तो पवित्र आहे पंरतू कमी जास्तपणा, उच्चनिचता ही त्याच्या बुध्दिमधे आहे म्हणून तो जातीने, धर्माने, धनाने श्रेष्ठ, कनिष्ठ ठरत नसून तो कर्माने श्रेष्ठ कनिष्ठ ठरतो म्हणून त्यांतीन बुध्दिप्रामाण्ता, समता व मानवता कशी निर्माण होवून सर्वांना रोजगार व स्वरोजगाराची साधने उपलब्ध होवून त्यातून त्यांचे कसब कला कौशल्य वाढविण्याचे मार्गदर्शन केले आहे.

''थोडे दिन मद्य (दारू) वर्ज्य करा/ तोच पैसा भरा ग्रंथसाठी ग्रंथ वाचतांना मनी शोध करा/देऊ नका धारा/वैरभावा'' आमच्या समाजाला यांनी मद्य दारू, खाणे, पिणे, बाई, बाटली या नादी लावल्यानेच जास्त अधोगती झाली तेव्हा शेतकऱ्यांनी थोडे दिवस मध्य वर्ज करून तो पैसा ग्रंथ

पुस्तके यासाठी वापरा व वाचक करतांना त्यामधून नविन काहीतरी शोधून काढा, मनात वैरभाव निर्माण होईल असे काही न करण्याचा उपदेश त्यांनी केला आहे.

आमचा शेतकरी, शेतमजूर, कारागीर (शुद्र अतिशुद्र/बहुजन) हा स्त्रीच्या गर्भधारणा ते मरण या संस्कारापर्यंत कसा लुटला लुबाडला जातो तसेच वर्षभर येणारे सण, उत्सव, एकादशी पासून पोर्णिमा, अमावस्या पर्यंत आमचेजवळून दान गोळा करतात व आम्ही गेल्यावरही दहा दिवस येथेच्छ भोजन व दान घेतात हि शेतकऱ्यांची खरी अवस्था म. फूले यांनी मांडली त्याला पर्याय म्हणून त्यांनी विवेकसिंधू व ज्ञानेश्वरी हे ग्रंथ लिहून लोकांना भ्रमिष्ठ केले. त्यामूळेच कुराणासहीत मंहमदी (मुसलमान) लोंकाचा व्देष करू लागतो. त्यानंतर संत तुकारामांनी खरी व्यथा मांडली तेव्हा रामदास स्वामीला शिवाजी महाराजांचे गुरू दाखविले त्यांनी हयातभर बहुजनांच्या हितासाठी संरक्षणासाठी कार्य केले परंतु त्यांनी गौ प्रतीपालक संबोधीले म्हणजे रयतेचे राज्य सांभाळण्याचे सोडून काय गाय पाळण्याचा व्यवसाय केला काय हा प्रश्न निर्माण होतो? तसेच काश्मीर पंडीत गागाभट्टा व्दारे सुवर्णमुद्रा लाच देवून शिवाजी महाराजांचा राज्यभिषेक केला व शिवाजी महाराजांच्या औरस वारसास साताऱ्याचे गडावर डांबून अटकेत ठेवले व वर प्रचार केला कि शिवाजी महाराज शुद्र आहेत त्यांना राज्यभिषेक करण्याचा अधिकार नाही परंतु त्यांचा आम्ही डाव्या पायाच्या अंगठयाने टिका लावून राज्यभिषेक केल्याचे मिरविले, असा अपमान हा आमचाच नसून अनेक महापुरूषांचा अपमान केला व आजही प्रत्यक्ष अपमान करीत आहेत तेव्हा याविषयी जागृत होवून सर्वांनी पेटून उठणे ही काळाची गरज आहे.

त्यांनी आमच्या कुळांमधे भांडणे लावण्याचे काम केले, एकेकाला एकांतात भेटीला बोलावणे, तूमचे काम फडणविसाकडून करून देतो त्याचा एवढा मोबदला दयावा, काम न झाल्यास ते परत करेन, व माझ्या श्रमाबद्दल तुम्हास जे योगय वाटते तो मोबदला दयावा असा भ्रष्टाचार व काहीच दिले नाही तरी चिंता नाही त्याबद्दद माझी तक्रार राहणार नाही मला आपल्या विषयी आपुलकी आहे म्हणून मी तुमच्या कामात येतो आहे फक्त तूमच्या कामात यश मिळाले म्हणजे झाले. यावरून त्यांची कपटनिती व कुटनिती उघड करण्याचे कार्य म. फूले यांनी केले व आम्ही याला बळी न पडता आमचे कार्य यशोशिखरावर पोहचवावे.

राजा भुकेने व्याकुळ होवून मेला तरी त्याने ब्राम्हणापासून कर व शेतसारा घेवू नये. ब्राम्हणास ठेवी सापडल्यास त्याचा त्याने एकटयानेच उपभोग घ्यावा कारण ब्राम्हण सर्वांचा धनी (मालक) आहे. परंतु राजास धन सापडले तर अर्धे द्रव्य ब्राम्हणास दयावे अशी तरतूद कायदयात करून ठेवली. गावातील कंगाल, दिनदुबळे रात्रदिवस शेतीत राबून कबाळकष्ट करणारे निव्वळ अज्ञानी अडाणी आहेत. माळी, कुणबी, धनगर यासारखे शुद्रातिशुद्र यांच्या स्थितीकडे पाहणे लक्ष देणे तसेच शेतकऱ्यांनी नेहमी गुलामीतच रहावे यासाठी त्यांना शिक्षणच मिळू नये अशी तरतुद करून ठेवली होती परंतू म. फूले यांनी हंटर कमिशन पूढे सर्वांना मोफत प्राथमिक शिक्षणाची तरतूद केली. आज मोफत व सक्तीचे शिक्षणाचे जागतिकीकरणाचे नावाखाली पैसेवाल्यांनाच शिक्षण हि प्रथा येत आहे. त्यासाठी भांडवलदार, खाजगीकरण या विरूध्द बंड करण्याकरीता सर्वांनी सजग रहावे हेच म. फूलेच्या विचारातून सिध्द होते.

आमच्या अडीअडचीच्या वेळेस त्यांनी पैसा रसद पुरविली परंतु त्यावर चक्रवाढ व्याज, शुन्य वाढविणे व आयुष्यभर गुलाम करण्याचे षढयंत्र रचले. शुद्रातिशुद्रातील प्रत्येक व्यक्ति हा जे काम करतो तो त्याचा धर्म नसून धंदा उद्योग आहे त्यातून त्याच्या उदरपोषणाची सोय होते. परंतु ब्राम्हण जे काम करतात तेउद्योग/धंदा नसून सूड उगविणे, अज्ञानी लोकांना बुध्द (भोंदू) बनविणे, धुर्तपणा, दगाबाजी करणे हे कसब आहे व हे त्यांना चांगल्या प्रकारे अवगत आहे व शुद्रानिशुद्रांनी निर्दयी, विजयी लोकांची सेवा करणे हा त्यांचा धर्म नसून लाचारी व निरूपाय आहे. हे पटवून देण्याचे कार्य त्यांनी केले ''श्रम न करता धर्ममिषाने अज्ञानी लोकास लुटून आयते खाणे, ठकबाजी करून इंग्रजांच्या राजवटीत शुद्रातिशुद्रांना संकटात पाडणे असे फडके/पेशवे यांचे कावेबाज कार्य इतरांना हलके व अपवित्र मानने – जातीकसब शुद्रानिशुद्रांना 6000 जाती 75000 उपजातीत विभागून आपसात भांडणे लावणे वेश्येचा मुखरस पिऊन घरी आल्याबरोबर सोवळेचार करणे, अपिवत्रता :– शुद्रातिशुद्र

निर्वाहाकरीता मृत जनावरांचे मास खाणे ताज्या तवाण्या गायी गुरांचा वध करून मास खाणे हि ब्राम्हणांची मास खाण्याची गोडी होय.

'लोका सांग ब्रम्हज्ञान, आपण कोरडे पाषाण' असे नितीभ्रष्ट ब्राम्हण आहेत तेव्हा आपला रोजगार व स्वयंरोजगार कौशल्य वृध्दीसाठी त्यांचे मागे न लागता तथागत गौतम बुध्दाच्या 'अत्य दिप भव' या म्हणीचा वापर करून स्वतःच स्वतःचे मार्गदर्शक बनण्याचा प्रयत्न करावा.

म. फूले उद्योग व रोजगार स्वयंरोजगार व कौशल्याविषयी मार्गदर्शन करतांना सांगतात की, मानवाचे अनेक विविध उद्योग आहेत त्यामूळे बरा वाईट काळ जातो व स्वहितासाठी उद्योग करा असा मार्ग संताणास (मुलाबाळाना) सांगतात. त्यापैकी आळशी दृष्ट दुराचारी अशा लोकांना इतर लोक वैरी दुश्मन समजतात जसा ज्याचा धंदा तशीच फळे येतात यातूनच सुखदुःख निर्माण होतात. सत्य खरा उद्योग केल्याने सर्व रोग दूर होतात त्यांची प्रकृती सुदृढ राहते व उल्हासीत मन उद्योग काम करण्यासाठी झटत असते असा व्यक्ती संम्पत्तीचा सर्व काळ उपभोग घेवू शकतो त्यामुळे सदाचार व सुख त्याचेकडे नांदते व व्यवसायात यश प्राप्त होते.

जो व्यक्ति गरीब दिन दुबळयांकरीता उद्योग करतो त्याच्यामधे ममता, विद्या, सदगुण, सदाचार, कदर, जाणीव असल्यामुळे तो नेहमी दिनदुबळयांना मदत करतो त्याचे व्यवसायात यश मिळते. सर्व दुर्गूणांचा बाप आळस आहे ज्याने बाळपणी/लहानपणी आळस केला त्याच्या संसारात दुर्गूण भरले असतात व तो वृध्दपणात हायहाय करतो, उद्योग व्यवसाय सोडून कनक बनतो व जनतेस शिव्याशाप देत राहतो आळशी व्यक्तिस कधी सुख व समाधान मिळत नाही. श्रीमंत धनवान आळशी लोक जबर होतात. चोरून सट्टा जुगार खेळतात. व डाव जिकंताच ते पैसे वेश्येवर उधळतात, चोंबळयाना (चमच्यांना) खाऊ पिऊ घालतात व खेळात द्रव्य धन हरताच शेतावर काम करतात व त्यासाठी घरदार मुलाबाळांचा बळी देतात हे नेहमी नंगेभुखे असतात व जनतेसमोर पोटासाठी नेहमी हात पसरतात आळशी व्यक्तिचा धंदा हा भिकेस लावणारा आहे असे 'ज्योती' म्हणे आळशी लोक दुकान मांडती सोरटाचे (फसवेगीरी) त्याचे नावगाव नसते (व्याज बटटयाचे दुकान) ज्यांनी पैसे उचलते त्याला नाडवल्याशिवाय राहात नाही/त्याचा तमाशा होतो अशा आळशी लोकांची फजिती होते व त्यांना धुळ माती खाल्याशिवाय पर्याय नसतो. रोजगारासाठी जवळ पैसे नाही, अज्ञानी आहे परंतू नफा पाहीजे शेअर (भाग) खरेदी केल्यास गळयास फास लागतो त्याच्या पावतीत प्रमाणपत्रातच सर्व गोष्टी जळीबुटी लपलेली आहे त्याविषयी कुठेही न्याय मागता येत नाही तक्रार करता येत नाही हा फक्त कोरडा आर्शीवाद आहे. स्वतःच स्वतःचा खिसा कापणे होय 'ज्योती' म्हणे भाग बाजारात नुसता कागदाचाच खप आहे व दलालाचा नफा असून धनी बुडतो व कागदे पाहून रडतो शिव्याशाप देतो हा उद्योग निव्वळ लुटण्यासाठी आहे. सधन जगात गप्पा मारणारे, थापा देणारे, पैसा लुटतात शेत विकायला काढतात. यांच्या संगतीने द्रव्यहिन होवून प्राणास मुकावे लागते 'ज्योती' म्हणे.

परंतु याच भाग बाजारात उद्योग काढावे, हिशेब ठेवाल, रोजकिर्द खतावणी बिनचूक ठेवी, नफातोटा दयावा, असा व्यक्ति शोधावा एखादयाची जामीन घेवून नितीने वर्तन करावे, सर्वांची अब्रु पत वाचवावी व सर्व नफा जगाला दाखवावा असा व्यापार उद्योग केल्यास यश प्राप्त होते.

आळशी लोक धंदा करतात, भिंती फोडतात, चोरी करतात, मुकाटयाने चुपचाप जातात अशा दृष्ट व्यक्तिच्या अंगी गुण जडतात असा व्यक्ती सर्पासारखा होवून त्याचा जगाला त्रास होतो अशांच्या उद्योगास यश येत नाही ज्यांनी म्हणजे ''आघापेक्षा जास्त खर्च जे करिती/ते कर्जबाजाही होतात व जास्त कर्जात बुडून आपला जीव गमावून बसतात व मुलेवाडे उघडयावर पाडतात. म्हणून 'आमदणी अठ्ठणी खर्चा रूपया' माणूनच कुटूंबाचे हाल होतात व लोक वाममार्गाला लागतात.

म. फूले इंग्रजी राजवटीमुळेच शिक्षण घेवू शकले व त्यांना शुद्र अतिशुद्रांच्या दारीद्रय बेकारी व गुलामीचे कारण कळले त्यामुळेच त्यांनी आपल्या हयातीत व्यवस्थेविरूध्द संघर्ष केला ब्राम्हण्यवादी अर्थव्यवस्था ही शुद्रातिशुद्रांकडून दान धर्म या भरोशावर 100 टक्के रोजगाराची हमी त्यांनी मिळविली याला छेद देण्याचे व शुद्रातिशुद्रात कर्म महत्वाचे समजून कर्मानेच धन, संम्पत्ती, पत, पैसा, प्रतिष्ठा प्राप्त होवू शकते हा आत्म विश्वास निर्माण केला.

म. फूले यांच्या संघर्षातील मुद्दे घेवून त्याबाबी डॉ. बाबासाहेब आंबडेकरांनी संविधानात समाविष्ठ करून ज्याच्यात जी कला कौशल्य असतील ती वृध्दींगत करून रोजगार करण्याचे स्वातंत्र्य अधिकार व हक्क बहाल करण्याचे काम केले. प्रत्येक नागरीकाला त्याच्या क्षमतेनुसार काम व कामानुसार मोबदला मिळविण्याचा अधिकार सुध्दा दिला. या मोबदल्यात त्याच्या प्रत्येक काळानुसार आवश्यक गरजा अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, ओराग्य, दुरदर्शन, भ्रमणध्वनी पूर्ण करण्याची क्षमता असली पाहिजे असा असावा. संत कबीराचे दोघ्याप्रमाणे ''कहता हु की जान हुँ, मैने नही गवार, बैरानी गिरही कहा कामी वार न पार'' म्हणजेच समाजात जोपर्यंत अडाणी अज्ञानी, अंधश्रध्दाळू, स्वार्थी, भोंदूगिरी, चमचे लोक आहेत. तोपर्यंत समाजाची दारीद्रय बेकारी, भ्रष्टाचार यापासून सुटका होणार नाही परंतू म. फूलेच्या विचाराने प्रत्येक माणूस पेटून उठल्यास या समस्येतून प्रत्येक व्यक्ति स्वतःची व स्वतःबरोबर इतरांचीही सुटका करू शकतो व त्याला अवगत कला कौशल्य ज्ञानाचे भरवशावर तो आपला रोजगार स्वयंरोजगार चांगल्या प्रकारे करून स्वतःचे व पर्यायाने देशाच्या उत्पन्नात भर टाकू शकतो.

देशातील 80 ते 90 लोकांना रोजगार व स्वंयरोजगारात प्रगल्भ करण्यासाठी म. फूले यांनी जे लिखाण केले व समाजाला जी दिशा दिली त्याचा वापर करावा उद्योग व्यापार कोणता व कसा करावा आपल्यामधे असलेले कला गुण कौशल्य विकसीत करून त्याचा रोजगार मिळविण्यासाठी उपयोग करावा याचे साधे तंत्र त्यांनी सांगितले डोळयावर पटटी बांधून व्यापार न करता उघड डोळयांनी समाजाला त्रास कष्ट होणार नाहीत व जास्त नफा मिळविण्याची लालुच निर्माण न होता समाजहित डोळयासमोर ठेवून उद्योग व्यापार करावा तसेच आपल्या कमाईचा 20 वा भाग समाज देशाच्या विकासासाठी खर्च करण्याचे प्रबोधन म. फूले यांनी केले त्या 20 टक्के राशीतून समाजाचा व समाजातील गरीब दिन दुबळे यांचाही विकास होवू शकतो. त्यांच्या शिक्षण, आरोग्य विषयक सोयी सवलती मिळवून देता येतात त्यासाठी सर्वातोपरी प्रयत्न करण्याचे आव्हान केले तसेच आळशी लोक कोणता व्यापार व्यवसाय करतात व ते अधिक नफ्याच्या लालसेने अवैध व्यापाराकडे वळतात व त्यांच्या इतर पिढया नष्ट कशा होतात ते वाम मार्गाला कसे लागतात असा इशारा वजा सुचना सुध्दा करण्यात आली आहे.

## निष्कर्ष :

1) भारतातील जनतेला देव, श्रध्दा, अंधश्रध्दा, सण उत्सव या मागे लावून त्यांचे आर्थिक शोषण करण्यात येत आहे. त्यामुळे त्यांचे शोषण करण्यात येत आहे. त्यामुळे त्यांचे शोषण व पिळवणूक होतो.

2) देशात शुद्रातिशुद्रांकरीता जागतिकीकरणाच्या काळातही जैसे थे वादी वृत्ती वाढीस लावण्याचे प्रयत्न केले जातात.

3) भारत हा गुलामांचा देश असला तरी परकियांनी केलेल्या स्वाऱ्या व आक्रमण गाजविलेल्या सत्ता यामधे आर्य ब्राम्हण यांनी मानसीक गुलाम बनविण्याचे षढयंत्र राबविले.

4) म. फूले यांनी सांगीतले की ब्राम्हणांनी वर्णवादी, जातीवाद, उच्च निचता या नावाखाली आमच्यातील कला कौशल्य आळशी बनवून त्यांच्या अवलंबून असणारे परावंबित्व निर्माण करण्याचे कार्य केले.

5) आमचे सर्व नुकसान शिक्षण नसल्यामुळेच झाल्याचे निष्पन्न झाले तेव्हा काहीही करून शिक्षण मिळवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आव्हान केले.

6) भारतीय शेती, शेतकरी, शेतमंजूर यांच्या ऱ्हासास ब्राम्हण्यवादी अर्थव्यवसाय जबाबदार आहे असे स्पष्ट पणे ''शेतकऱ्यांचा आसूड'' या ग्रंथात स्पष्ट केले. त्यामुळे समाजात नैराश्यवाद, गरीबी, आळशीपणा निर्माण झाल्याची दिसते.

7) म. फूले यांनी सहकारी तत्वावर शेती, कृषी औद्योगीकी करण, शेतीचे अत्याधुनीकरण यासाठी विशेष आग्रह धरला.

8) आमचे मन, मनगट शाबुत असेल तर आम्ही काहीही करू शकतो. असा आत्मविश्वास निर्माण केला व आपले कर्म काम चांगले असेल तर यश आपोआप प्राप्त होते.
9) ब्राम्हणवादी अर्थव्यवस्थेने आमचे शोषण केस केले त्यावर काय उपाय करावा म्हणजे आमची प्रगती होईल हे सुचविले
10) आपसी मत भेद निर्माण करणे, भांडणे लावणे, चुगल्या चहाळया करणे यापासून आम्ही अलिप्त राहीले पाहीजे व यापासून दूर राहील्यासच आमची उद्योग व्यवसायात प्रगती होईल.
11) आमचे कुटूंबाच्या खर्चाविषयी नियोजन असावे व उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नये असेही मागदर्शन त्यांनी केले.
12) भारतातील बहुजन श्रमीक वर्ग 8 ते 10 तास अविरत मेहनत (काम) करू शकतो तेव्हा त्याच्या आवडीचे काम करण्याची प्रेरणा त्याला मिळावी त्या उद्योग व्यवसायासाठी लागणारे भांडवल, यंत्रणा उभारावी व स्वतःही रोजगार मिळवावा आणि इतरांनाही रोजगार मिळवून दिला तरच त्याचे हातून समाजाचे ऋण कर्ज फेडल्यासारखे होईल.

असे उद्योग, व्यापार, रोजगार स्वयंरोजगार संबंधी विशेष मांडले आहेत ते सदैव आजच्याही काळात लागू पडतात व संकटाच्या काळात त्यातून मुक्त होण्यासाठी प्रेरणा देत राहतात तेव्हा त्याची सतत अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

## संदर्भ :

1) म. फुले समग्र वाङःमय – श्री धनंजय कीर डॉ. स. ग. माफसे आणि डॉ. य. दि. फडके
2) सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक – हिन्दी अनुवाद प्रा. वेदकुमार वेदालंकार
3) विशेष लेख – दै. मतदार, दै. दिव्य मराठी दै. लोकमत दै. लोकसत्ता
4) साप्ताहीक – बहुजन नायक, बहुजन भारत, बहुजन संघठक,
5) विशेषांक – प्रेरणा

LBP PUBLICATION